**इंडिया फाऊंडेशन फॉर द आर्टस्, झपुर्झा कला आणि संस्कृति संग्रहालय, पुणे यांच्या सहकार्याने त्यांच्या आर्काइव्ह्ज आणि संग्रहालय कार्यक्रमासाठी प्रस्ताव मागवत आहे**

**अर्ज पाठवायची अंतिम तारीख: January 30, 2024**

आयएफए (IFA), झपुर्झा कला आणि संस्कृति संग्रहालय (ZMAC), पुणे यांच्या सहकार्याने IFA-ZMAC स्कॉलरली प्रोजेक्ट आणि IFA-ZMAC क्रिएटिव्ह प्रोजेक्टसाठी, त्यांच्या आर्काइव्ह्ज आणि संग्रहालय कार्यक्रमाअंतर्गत अर्ज मागवत आहे. या कार्यक्रमाचे दुहेरी उद्दिष्ट आहे: कला अभ्यासक आणि संशोधकांना, आर्काइव्ह्ज आणि संग्रहालयातील संग्रहांसाठी, सार्वजनिक सहभाग मिळावा याकरिता नवीन, महत्त्वपूर्ण आणि सर्जनशील दृष्टिकोन निर्माण करण्याची संधी देणे आणि याकरीता एक सबळ व्यासपीठ मिळवून देणे. या कार्यक्रमांतर्गत पूर्वीच्या प्रकल्पांबद्दल येथे वाचा.

**अर्ज पाठवायची अंतिम तारीख: January 30, 2024**

**झपुर्झा कला आणि संस्कृति संग्रहालयाबद्दल** (ZMAC) **माहिती:**

ZMAC, पुणे, हा महाराष्ट्रातील खडकवासला धरणाच्या काठावर वसलेला, श्री. अजित गाडगीळ यांच्या नेतृत्वाखालील पु. ना. गाडगीळ आर्ट आणि सांस्कृतिक फाऊंडेशनच्या अंतर्गत असलेला एक ना-नफा तत्वावर चालणारा कला उपक्रम आहे. याचे नाव, मराठी कवी, केशवसुत, यांच्या झापुर्झा नावाच्या कवितेवरून देण्यात आले आहे. याचा अर्थ 'मनाची सर्जनशील अवस्था' असा आहे. हे संग्रहालय, 'संग्रहालय म्हणजे शिक्षणाचे साधन' ही संकल्पना जोपासते आणि कलाकारांसाठी शिक्षण आणि स्थानिक कारागीर समुदाय आणि सामान्य जनतेसाठी सांस्कृतिक केंद्र निर्माण करणे हा त्यांचा मानस आहे. श्री गाडगीळ यांच्या वैयक्तिक संग्रहातून निर्माण झालेल्या ZMAC कडे, दुर्मिळ दागिन्यांपासून, पारंपारिक आणि समकालीन चित्रकारांची चित्रे, कापडे, राजा रविवर्मा यांच्या लिथोग्राफ प्रिंट्स, लघुचित्रांचा संग्रह, विविध प्रकारची हस्तलिखिते, दैनंदिन वस्तू आणि वैविध्यपूर्ण वस्तू आहेत.

**IFA-ZMAC स्कॉलरली आणि क्रिएटिव्ह प्रोजेक्ट्सच्या व्याप्तीबद्दल:**

या सहयोगी प्रकल्पासाठी, आम्ही ZMAC मधील तीन संग्रहांसाठी कार्य करण्यासाठी अर्ज मागवत आहोत.

- पुण्याच्या कलात्मक वारशावर अभ्यासपूर्ण प्रकल्प: या संग्रहामध्ये पुण्याच्या कलात्मक वारशातील ठेवे आहेत, जे अनेक सर्जनशील विषयांच्या संबंधित आहेत: चित्रकला, शिल्पकला, सजावटीच्या कला

आणि गणपती सजावट यासारखे विशेष प्रकार. प्रत्येक कला प्रांतात काही दिग्गज असतात, ज्यांचा वारसा शहरातील समकालीन कलाकारांच्या कार्याला आकार देत असतो आणि पुण्यातील कलाक्षेत्राचा पाया रचण्यात यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. शहराचा हा समृद्ध कलात्मक वारसा साजरा करण्यासाठी, संग्रहालय, त्यांच्या संग्रहावर आधारित, एक एकत्रित **प्रदर्शन** ठेवण्याचा प्रयत्न करत आहे.

पुण्याच्या **कलात्मक वारशावरील विद्वत्तापूर्ण प्रकल्पांसाठी** आम्ही खालील प्रकारच्या प्रस्तावांना प्रोत्साहित करू इच्छितो:

- या सद्य संग्रहाबद्दलचे संशोधन आणि प्रदर्शनासाठी संशोधनावर आधारित साहित्य तयार करणे.
- ज्यामध्ये प्रत्यक्ष बाहेर फिल्डवर जाऊन साहित्य मिळवणे आणि त्याच्या योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करणे या कामांचा सहभाग आहे.
- कलाकारांच्या ऑडिओ/व्हिज्युअल मुलाखती, मोनोग्राफ, निबंध, दीर्घ स्वरूपाचे लेख, वर्णनात्मक कॅटलॉग इत्यादीसारखे मूर्त परिणाम निर्माण करून संस्थेची नॉलेज बँक समृद्ध करणे.
- ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही प्रकारच्या कार्यक्रमांद्वारे त्यांचे संशोधन सादर करणे.

**- चांदीच्या संग्रहावर आधारित सर्जनशील प्रकल्प:** या संग्रहात, महाराष्ट्रातील काही भाग, कच्छ, जयपूर, कटक आणि करीमनगरमधील चांदीचे दागिने आणि वस्तूंचा समावेश आहे, ज्यामध्ये फिलीग्री, एम्बॉसिंग, कोरीवकाम आणि इतर अनेक शैलींचा समावेश आहे. सामान्यतः लोकं घालतात अशा दागिन्यांपासून ते गुलाबदाणी, दागिन्यांची पेटी, सुपारी आणि चुन्याच्या डब्यासारख्या वस्तूंपर्यंत असलेला हा चांदीचा संग्रह उपखंडातील आणि त्यापलीकडील विविध संस्कृतींच्या प्रभावाचे प्रतिनिधित्व करतो. या संग्रहाशी संबंधित सर्जनशील प्रकल्प भौतिक संस्कृती आणि डिझाइन इतिहासाचा सखोल अभ्यास करू शकतो.

**चांदीच्या संग्रहावर आधारित सर्जनशील प्रकल्पांसाठी** आम्ही खालील प्रकारच्या प्रस्तावांच्या शोधात आहोत:

- या संग्रहाची कलात्मक दृष्ट्या पुनर्रचना करण्यासाठी कलात्मक कार्य करणे.

- भौतिक संस्कृती आणि डिझाइन इतिहासावरील संशोधनासाठी कल्पना आणि कार्य योजना विकसित करणे आणि फोटो निबंध, सचित्र कॅटलॉग, विविध शैली आणि उत्पादन तंत्रांच्या प्रक्रियेचे ऑडिओ-व्हिज्युअल दस्तऐवजीकरण इत्यादी करणे.
- कार्यशाळा, क्युरेटोरियल वॉक-थ्रू, क्राफ्ट प्रात्यक्षिके इत्यादींद्वारे सार्वजनिक प्रसार वाढवणे आणि अशा सार्वजनिक सहभागासाठी कार्यक्रमाची रूपरेषा तयार करणे.

वस्त्र संग्रहावर आधारित सर्जनशील प्रकल्प: २००० पेक्षा जास्त वैविध्यपूर्ण वस्त्रांसह, संग्रहालयातील संग्रह, टेक्सटाईल आणि डिझाइन इतिहासाच्या अभ्यासकांसाठी आणि इतर उत्साही लोकांसाठी एक संभाव्य संसाधन म्हणून उपयोगी पडतो. या संग्रहात देशातील विविध प्रकारच्या विणकाम आणि भरतकामाच्या परंपरांचा समावेश आहे - बनारसी साड्या, सिल्क आणि कॉटन माहेश्वरी साड्या, गुजरातचे डबल इक्कत सिल्क, महाराष्ट्रातील पैठणी साड्या आणि भरतकाम केलेल्या पारसी गारा साड्या आणि अगदी विविध पगड्या आणि फेटा, कुंची, टोपडं आणि दुपटं यांसारखे शिवलेले कपडे आणि कृष्णाची कथा दर्शविणारे पिचवाईसारखे रंगवलेले कापड. या संग्रहासह सर्जनशील प्रकल्प विणकामाच्या परंपरेचा इतिहास शोधू शकतो आणि विविध माध्यमांतून आकृतिबंधांची उत्पत्ती आणि रूपांतर कसे झाले याचा अभ्यास करू शकतो.

**कापड संकलनावर आधारित सर्जनशील प्रकल्पांसाठी** आम्ही खालील प्रकारच्या प्रस्तावांच्या शोधात आहोत:

- या संग्रहाची कलात्मक दृष्ट्या पुनर्रचना करण्यासाठी कलात्मक कार्य करणे.
- विणकामाच्या परंपरा, त्यावरील सांस्कृतिक आणि प्रादेशिक प्रभावांवर संशोधन करण्यासाठी कल्पना आणि कार्य योजना विकसित केली आहे आणि फोटो निबंध, सचित्र कॅटलॉग, विणकामाच्या विविध शैली आणि तंत्रांच्या प्रक्रियेचे ऑडिओ-व्हिज्युअल दस्तऐवजीकरण इत्यादी करणे.
- कार्यशाळा, क्युरेटोरियल वॉक-थ्रू, क्राफ्ट प्रात्यक्षिके इत्यादींद्वारे सार्वजनिक प्रसार वाढवणे आणि अशा सार्वजनिक सहभागासाठी कार्यक्रमाची रूपरेषा तयार करणे.

आम्ही अशा प्रकल्पांना प्रोत्साहन देतो जे आंतरविद्याशाखीय आणि सहयोगी दृष्टिकोन ठेवतात.

**दोन्ही प्रकारच्या प्रकल्पांचा साधारण प्रस्तावित कालावधी एक वर्ष इतका आहे.**

प्रकल्पांवर काम करणाऱ्या प्रकल्प समन्वयकांना पुण्यातील ZMAC येथे प्रत्यक्ष येऊन तेथील संग्रहाबरोबर काम करावे लागेल. प्रकल्प समन्वयकांना प्रकल्पाच्या कालावधीत वर नमूद केलेल्या विशिष्ट संग्रहामध्ये प्रवेश असेल. संशोधनासाठी उपलब्ध असलेले संकलन आणि साहित्य याबद्दल अधिक माहितीसाठी, कृपया राजू सुतार, क्युरेटर आणि संग्रह प्रमुख यांच्याशी raju.sutar@zapurza.org येथे संपर्क साधा

**अर्जदार कसा असावा:**

- आम्ही क्युरेटर, कलाकार, संशोधक, लेखक, कलाकार तसेच इतर सर्जनशील अभ्यासक आणि संशोधनाची पार्श्वभूमी असलेल्या विद्वानांकडून अर्ज मागवतो आहोत जे आर्काइव्हज आणि संग्रहालय संग्रहांमध्ये काम करण्यास उत्सुक आहेत.
- **मराठी भाषा** जाणणाऱ्या अर्जदारांनी आवर्जून अर्ज करावा.
- ZMAC पुण्यात असल्यामुळे, आसपासच्या प्रदेशातील अर्जांना प्रोत्साहन दिले जाते आहे, कारण प्रकल्प समन्वयकांना प्रकल्प कालावधीत संग्रहालयात बराच वेळ घालवावा लागेल.
- फक्त भारतीय नागरिक अर्ज करू शकतात. आमच्या पात्रता निकषांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी, येथे क्लिक करा.

**अर्ज असा भरावा:**

खालील सर्व **एकाच इमेलद्वारे** आम्हाला पाठवावे:

- प्रकल्पाचे थोडक्यात वर्णन करणारा प्रस्ताव (त्यातील सर्जनशील परिणामांसह किंवा संशोधन प्रश्नांसह जर तुमचा प्रस्ताव संशोधन असेल तर) ज्याचे रूपांतर दृश्य आणि लिखित स्वरूपात करता येईल. वर्णनात दृष्टीकोन, कार्यपद्धती आणि संभाव्य परिणामांचा समावेश असावा.
- त्या सामग्रीतून जर इतर काही एक सार्वजनिक कार्यक्रम विकसित करता येऊ शकत असतील तर त्यावर एक **संक्षिप्त टीप** लिहा.
- प्रकल्पाचे तपशीलवार **वेळापत्रक**.
- प्रकल्पाचा तपशीलवार **खर्चाचा अंदाज**.
- तुम्ही क्युरेटर, कला अभ्यासक किंवा संशोधक म्हणून सहभागी होता अशा प्रकल्पांच्या संक्षिप्त वर्णनासह तुमचा बायोडाटा ज्यात त्या प्रकल्पांतील दृष्टीकोन, कार्यपद्धती आणि परिणाम यांचा समावेश असावा. कृपया आम्हाला प्रत्यक्ष कागदपत्रे जोडून न पाठवता **फक्त**

**त्याच्या लिंक्स** पाठवाव्यात.

- तुम्ही तुमचा प्रस्ताव इंग्रजीसह **कोणत्याही भारतीय भाषेत** पाठवू शकता.

तुमचे अर्ज किंवा कोणतीही शंका ऋत्विका मिश्रा यांना, 'Application for IFA - ZMAC', या सब्जेक्ट लाईनसह ritwika@indiaifa.org येथे ईमेल करा.

**प्रकल्पाचे बजेट:**

- प्रकल्पाचा कमाल खर्च रुपये **2,00,000/-**
- प्रकल्पाच्या संपूर्ण कालावधीसाठी तुम्ही प्रकल्पाच्या **प्रस्तावित खर्चाच्या एकंदरीत 35%** इतकेच मानधन बजेटमधे दाखवू शकता. वरील कमाल रक्कम ही मानधनाच्या रक्कमेसह आहे.
- प्रकल्प निधी केवळ प्रकल्प संबंधित खर्च आणि कामकाजासाठी असेल; कोणत्याही कायमस्वरूपी पायाभूत सुविधा किंवा उपकरणे खरेदीसाठी पैसे वापरता येणार नाहीत.

**महत्त्वाच्या तारखा:**

- अर्ज स्वीकारायची अंतिम तारीख: January 30, 2024
- निवड झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती **फेब्रुवारी 2024** मध्ये होणे अपेक्षित आहे.
- प्रकल्प **मार्च 2024** पर्यंत एक वर्षाच्या कालावधीसाठी सुरू होईल.

IFA हा प्रकल्प थेट तुमच्यासोबत प्रकल्प समन्वयक म्हणून राबवेल.

*कृपया लक्षात घ्या आयएफए एक असे सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी वचनबद्ध आहे जे मुलांसह प्रत्येकाला समर्थन देते, त्यांचा आदर करते आणि त्यांना संरक्षण देते. प्रत्येक अर्जदाराने हे ध्यानात ठेवले पाहिजे आणि या संकल्पनेशी कायम इमान राखले पाहिजे.*

कळावे लोभ असावा
आयएफए टीम